## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष

## निशाणी क्र. ०२ लगत

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – हिरालाल वना सुर्यवंशी,

वय – ३७ वर्षे,

व्यवसाय – पोकॉ. ब. क्र. ४५६,

सध्या नेमणुक – दोंडाईचा पोलीस स्टेशन, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. ए. लाली यांचे मार्फत.**

०१. दि. २३.०१.२०२३ रोजी माझी नेमणुक दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर होती. त्यादिवशी पोनि. श्री. दुर्गेश तिवारी यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जुना शहादा रोडवरील कालिका माता मंदिराजवळ एका काटेरी झुडपाच्या आडोश्याला एक महिला ही गावठी हातभट्टीची दारुची चोरटी विक्री करीत आहे. त्यावर पोना. सदीप कदम यांनी दोन पंचांना पोलीस स्टेशन येथे बोलविले व त्यांना बातमीची हकीकत सांगितली. त्यावर ते पंच म्हणुन येण्यास तयार झाले. त्यानंतर मी, पोकॉ. अनिल धनगर, पोकॉ. संजय बैसाणे, पोहेकॉ. संदीप कदम, मपोकॉ. वैशाली सोनवणे असे सदर ठिकाणी खाजगी वाहनाने रवाना झालो.

०२. बातमीच्या ठिकाणी जवळ जावुन अलीकडे आमची वाहने उभी केली व पुढे पायी चालत गेलो. त्याठिकाणी एक महिला काटेरी झुडपाच्या आडोश्याला खाली बसलेली दिसुन आली. तिच्या कब्ज्यामध्ये तीन प्लॅस्टीकचे कॅन व एक मग असे होते. आम्ही तिच्यावर १४.४५ वाजता छापा टाकला. सदर महिलेस तिचे नाव विचारले असता तिने तिचे नाव सुनिता भाईदास नेतले असे सांगितले. तिच्या कब्ज्यातुन प्लॅस्टीकच्या तीन कॅनमध्ये प्रत्येक कॅनमध्ये २० लिटर अशाप्रमाणे एकुण ६० लिटर गावठी हातभट्टीची दारु व एक प्लॅस्टीकचा मग असा मुद्देमाल मिळुन आला.

जप्त मुद्देमालातुन पोहेकॉ. संदीप कदम यांनी १८० मी. ली. दारु काचेच्या स्वच्छ बाटलीमध्ये काढुन घेतली. सदर बाटलीवर स्वत:च्या व पंचांच्या सहयांचे लेबल बुचावर लावुन ती बाटली सिल करण्यात आली. तसेच उर्वरित मुद्देमाल जागीच नष्ट केला. त्यानंतर सदर महिलेस पोलीस स्टेशन येथे आणले व मी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच फिर्याद आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर फिर्यादीस **नि. क्र. ०७** देण्यात येते.) मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकेन. आरोपी आज रोजी न्यायालयासमक्ष हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज व गैरहजेरीमध्ये काम चालविणेबाबत पुरसिस अनुक्रमे नि. क्र. ०५ व ०६ कडे दाखल आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. ई. भावसार यांचे मार्फत.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खाजगी वाहनाने आम्ही गेल्याचे मी सांगत आहे त्या वाहनाचा नोंदणी क्रमांक अथवा त्याच्या चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला छाप्याचे कामी जाण्याकरीता लेखी स्वरुपात आदेशित केले नव्हते. ज्या बाटलीमध्ये नमुन्या दाखल मुद्देमाल काढुन घेतल्याचे मी सांगत आहे ती बाटली रिकामी असतांना तिचा पंचनामा माझ्यासमक्ष करण्यात आलेला नव्हता. सदर बाटली सिलबंद करण्यापुर्वी त्याच्यामध्ये माझ्यासमक्ष कोणतेही संरक्षक टाकण्यात आले नव्हते. उर्वरित मुद्देमाल नष्ट करण्यापुर्वी न्यायालयाची परवानगी घेण्यात आलेली नव्हती.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला इतर गुन्हयांमध्ये देखील पंचांची आवश्यकता भासत असते. हे म्हणणे खरे नाही की, इतर गुन्हयांत आरोपीने पंच म्हणुन काम पाहण्यास नकार दिल्याने मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की,

प्लॅस्टीकचा कॅन व मग दुकानात गेल्यास सहजरित्या उपलब्ध होतात. हे म्हणणे खरे नाही की, खटल्यातील मुद्देमालाशी आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.02.13 17:51:01 +0530

दिनांक : १३/०२/२०२६ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – जी. एस. अहिरे,

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. – १३.०२.२०२६.

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)